**पोलीस आयुक्तालय नवी मुंबई**
**प्रेसनोट**

CB/47/2026

**गुन्हे शाखा, नवी मुंबई** **दिनांक २०.०७.२०२६**

## ‘‘ खून झालेल्या अनोळखी मयताची ओळख पटवुन, खून करणा–या आरोपीस गुन्हे शाखेकडून २४ तासाचे आत जेरबंद’’

मा.पोलीस आयुक्त, नवी मुंबई, श्री.मिलिंद भारंबे, पोलीस सह आयुक्त, श्री. दीपक साकोरे, अपर पोलीस आयुक्त (गुन्हे), श्री. प्रमोद शेवाळे, पोलीस उप आयुक्त गुन्हे शाखा श्री.सचिन गुंजाळ, सहाय्यक पोलीस आयुक्त, गुन्हे शाखा, श्रीमती प्रेरणा कट्टे यांनी एन आर आय पोलीस ठाणे, नवी मुंबई गुन्हा रजि. क्रमांक २२४/२०२६ बीएनएस कलम १०३(१) मधील मयत झालेल्या अनोळखी इसमाची ओळख पटवुन गुन्हा उघडकीस आणणेबाबत सुचना दिलेल्या होत्या.

त्याप्रमाणे, नमुद गुन्हयाचे घटनास्थळी गुन्हे कक्ष २ कडील पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी तात्काळ भेट देवुन तांत्रिक तपास करून नमुद गुन्ह्यातील साक्षीदार शोध घेवुन त्याचेकडे कौशल्यपुर्ण तपास करून गुन्ह्याबाबत माहिती घेतली असता यातील मयत इसमाचे नाव सलमान शेख असे असुन तो भंगार वेचण्याचे काम करत होता व घटनास्थळासमोरील डिमार्ट शेजारी असलेल्या खंडर इमारतीमध्ये राहत होता. त्यातुन मिळणाऱ्या तो पैशातुन नशा करून लोकांना शिवीगाळ करीत असे. दिनांक १६/०७/२०२६ रोजी २३:३० वाजण्याचे सुमारास यातील मयत याने भंगार वेचणारा आरोपी इसम नामे – इरफान अन्सारी याचे सोबत दारू पिऊन शिवीगाळ व धक्का–बुक्की केल्याने त्यांचेमध्ये वाद झाला होता. त्यावेळी इसम नामे इरफान अन्सारी याने त्यास लाकडी दांडक्याने डोक्यात मारून तेथुन पळुन गेल्याचे निष्पन्न झाले.

यातील आरोपी हा गुन्हा करून पळुन गेला असल्याने तांत्रिक तपास करून व गोपनिय बातमीदाराव्दारे आरोपीत हा भिवंडी येथे असल्याची माहिती मिळाल्याने भिवंडी येथे पोलीस पथकास पाठवुन आरोपी नामे– मोहम्मद इरफान मोहम्मद हुसेन अन्सारी, वय ३६ वर्ष, रा.हाउस नं–२६६, जमीयत कॉलनी, आमपाडा रोड, सिराजुल उलम मस्जीद जवळ, अन्सार मोहल्ला, दांडेकरवाडी, भिवंडी, ठाणे याला ताब्यात घेऊन त्याच्याकडे तपास केला असता त्याने सांगीतले की, मयत इसम हा दारू पिऊन त्यास शिवीगाळ व धक्काबुकी करत होता त्यामुळे त्याने मयत नामे सलमान अन्वर शेख वय २७ वर्षे रा. नुरी मस्जीदचे पाठीमागे, करबाला चाळ, मंडाळा–मानखुर्द मुंबई यास लाकडी दांडक्याने डोक्यात मारून मयतास ठार मारल्याची कबुली दिली आहे. नमुद आरोपीस यास अटक करून मा.न्यायालयात हजर केले असता त्याची दिनांक २३/०७/२०२६ रोजी पर्यंत पोलीस कोठडी मंजुर करण्यात आली आहे. नमुद गुन्ह्याचा पुढील तपास वपोनि श्री.सुनिल वाघमारे, एनआरआय पोलीस ठाणे हे करीत आहेत.

सदरची उल्लेखनीय कामगिरी सहाय्यक पोलीस आयुक्त श्रीमती प्रेरणा कट्टे यांचे मार्गदर्शनाखाली गुन्हे शाखा, कक्ष २, वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. अनिल पाटील यांचे नेतृत्वात सपोनि/अभिजीत पाटील,

पोउपनि/संजय पवार, पोउपनि/ अभिजीत देशमुख, पोहवा ४४८३/विश्वनाथ पांचाळ, पोहवा/२००१ लक्ष्मण कोपरकर, पोहवा/२३६५ राजकुमार दुधाळ, पोहवा ३८६ दिनेश जोशी, पोना/३०३४ विनायक गायकवाड, पोना/२८३६ राजेश मोरे, पोशि/३१९६ पुरुषोत्तम भोये, पोशि/४४०९ संतोष तांदळे, चापोहवा/६०३ सोनवलकर यांनी पार पाडली आहे.